गोपनीय

क्रमांक - वाकामूअ/असांसं/२०२१-२२/प्रशा-१/ 37
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा,
८ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
http://mahades.maharashtra.gov.in

दिनांक - १५ मार्च, २०२२

**प्रति,**

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

**विषय : कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्याबाबत...**

**संदर्भ : १) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि. १ नोव्हेंबर,२०११.**
**२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ७ फेब्रुवारी,२०१८.**
**३) नि.वि. शासन निर्णय क्र. १०१७/प्र.क्र.१०९/का.१४२७, दि. ९ मे,२०१८.**

**महोदय,**

कृपया उपरोक्त शासन निर्णयाचे तसेच सोबतच्या परिपत्रकाचे अवलोकन व्हावे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५/१२/२०१७ च्या शासन परिपत्रकात नमुद केल्यानुसार शासकीय सेवेतील गट - अ व गट - ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्य मूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने "महापार" या प्रणालीत नोंदविण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तथापी, यासाठी काही कालावधी लागणार आहे, त्यामुळे सध्या सन २०२१-२०२२ या वर्षीचे कार्य मूल्यमापन अहवाल सध्या नेहमीच्या पद्धतीने लिहिण्यात यावे.

३. शासनाच्या "कागदविरहीत कार्यालय" या धोरणास अनुसरुन कार्यमूल्यमापन अहवालाचे संवर्गनिहाय कोरे नमूने/ सूचना वजा परिपत्रक संचालनालयाच्या वेब साईटवर ठेवण्यात आले आहेत. सदरील संदर्भीय क्र. २ अन्वये नवीन सुधारीत कार्यमूल्यमापन अहवालाचे कोरे नमूने/सूचना वजा परिपत्रक http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'सेवासबंधी' (Service Related) या शीर्षाखाली ठेवण्यात आलेले आहेत. तरी वरीलप्रमाणे का.अ. डाऊनलोड करुन घेण्यात यावेत.

४. सदर संदर्भीय क्र. १ च्या शासन निर्णयातील मूददा क्र. २४ मध्ये अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल द्विप्रतीत लिहिण्याबाबत स्पष्ट केले आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, या संचालनालयाच्या संवर्गावरील तथा प्रतिनियुक्तीवर अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल एका प्रतीत पाठविण्यांत येतात अथवा त्याची छायाप्रत दुय्यम प्रत म्हणून पाठविण्यांत येते. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल नियोजन विभाग, मंत्रालय येथे पुढील प्रक्रिया, पदोन्नती, स्थायीत्व लाभ इ.बाबीसाठी पाठविण्यांत येतात.

५. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या वर्षाचे (लागू कालावधीचे) अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल द्विप्रतीत व कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल एकप्रतित लिहिले जाणार आहेत त्यांचे स्वहस्ताक्षरात (छायांकित प्रत नाही) ३० एप्रिल पर्यत प्रतिवेदन करुन व पुर्नविलोकन अधिकाऱ्याने सदर कार्यमूल्यमापन

अहवाल पुनर्विलोकन करुन १५ मे पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात यावेत, जेणेकरुन त्याची नोंद घेऊन प्रशासकीय कामकाजासाठी तथा नियोजन विभागास विहित वेळेत पाठविणे संचालनालयास शक्य होईल.

(नि.म.प्रभुदेसाई)
**उपसंचालक (प्रशासन)**
**अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई**

**प्रत :- उप सचिव, नियोजन विभाग (का-१४२७), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.**